दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

### ठाण्यात 5 झोपड्यांना आग लागून सिलिंडरचा स्फोट

**ठाणे :** ठाण्यातील कळवा (पश्चिम) भागात शुक्रवारी सकाळी आगीची एक मोठी दुर्घटना घडली. खारेगाव पुलाजवळ आणि सहयोग सोसायटीच्या मागील बाजूस असलेल्या पाच तात्पुरत्या झोपड्यांना अचानक भीषण आग लागली. या आगीच्या भडक्यात एका झोपडीतील लहान एलपीजी (LPG) सिलिंडरचा भीषण स्फोट झाल्याने परिसरात काही काळ घबराट पसरली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### बीसीसीआयच्या 95व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मोठे निर्णय

**मुंबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (BCCI) पंच्याण्णव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत भारतीय क्रिकेटच्या प्रशासनाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण व दूरगामी निर्णय घेण्यात आले आहेत. मुंबईतील मुख्यालयात पार पडलेल्या या बैठकीत क्रिकेटच्या विकासाला गती देणारे आणि प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक करणारे विविध प्रस्ताव मंजूर करण्यात आले. यामध्ये आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलची रचना, आगामी काळातील अर्थसंकल्प, पंच व मॅच रेफरींचे वेतन, तसेच बीसीसीआयच्या आगामी शताब्दी सोहळ्याच्या तयारीचा प्रामुख्याने समावेश आहे.

## 2006 च्या बहुचर्चित निठारी हत्याकांडातील मुख्य आरोपी सुरिंदर कोळीची आत्महत्या; हरिद्वारमधील चहाच्या टपरीवर गळफास

**हरिद्वार :** २००६ मधील नोएडा येथील बहुचर्चित आणि थरारक निठारी नरसंहार प्रकरणातील मुख्य आरोपी सुरिंदर कोळी याने शुक्रवारी (१८ सप्टेंबर २०२६) उत्तराखंडमधील हरिद्वार येथे गळफास लावून आत्महत्या केली. सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्व प्रकरणांतून निर्दोष मुक्तता केल्यानंतर कोळी जवळपास १९ वर्षांनंतर तुरुंगाबाहेर आला होता. गेल्या काही दिवसांपासून तो हरिद्वारमधील एका चहाच्या टपरीवर काम करत होता, त्याच ठिकाणी त्याचा मृतदेह आढळून आला.

माहितीनुसार, हरिद्वारमधील भूपतवाला भागातील सप्त सरोवर रस्त्यावर असलेल्या लालमाता मंदिरासमोरील एका चहाच्या टपरीवर सुरिंदर कोळीचा मृतदेह दोरीच्या साहाय्याने लटकलेल्या अवस्थेत सापडला. या घटनेची माहिती मिळताच सप्तर्षी चौकीच्या पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाजवळ सापडलेल्या [Aadhaar Redacted] वरून त्याची ओळख पटवण्यात आली, ज्यानंतर पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांना याबद्दल माहिती दिली.

आत्महत्येचे कारण अस्पष्ट

सुरिंदर कोळी याने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी सखोल तपास सुरू केला आहे. प्राथमिक माहितीनुसार कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, मात्र आत्महत्येचे नेमके कारण अजून स्पष्ट झालेले नाही. पोलीस या प्रकरणातील सर्व संभाव्य कोनांचा विचार करून तपास करत आहेत.

सर्वोच्च न्यायालयाकडून अंतिम प्रकरणात निर्दोष मुक्तता

निठारी हत्याकांडातील विविध खटल्यांमुळे सुरिंदर कोळीला तब्बल १९ वर्षे तुरुंगात राहावे लागले होते. ऑक्टोबर २०२३ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने १२ प्रकरणांमध्ये त्याची निर्दोष मुक्तता केली होती. तपासातील गंभीर त्रुटी आणि पुराव्यांवरील संशय लक्षात घेऊन न्यायालयाने हा निर्णय दिला होता. जुलै २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेही या मुक्ततेविरोधातील याचिका फेटाळून लावल्या होत्या. तरीही, रिम्पा हलदर या अल्पवयीन मुलीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणात शिक्षा झाल्यामुळे कोळी तुरुंगातच होता. दया याचिकेवर निर्णय होण्यास झालेला विलंब विचारात घेऊन २०१५ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्याची फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदलली होती. त्यानंतर, नोव्हेंबर २०२५ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश बी. आर. गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या खंडपीठाने कोळीची पुनर्विलोकन याचिका मंजूर करत त्याची अंतिम खटल्यातूनही निर्दोष मुक्तता केली. पोलिसांनी घेतलेला जबाब आणि सादर केलेले पुरावे शिक्षेसाठी पुरेसे नाहीत, असा निष्कर्ष काढत जर तो इतर कोणत्याही गुन्ह्यात हवा नसेल तर त्याची तात्काळ सुटका करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. तपासातील त्रुटींवर बोट ठेवताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की, कोळीला दीर्घकाळ पोलीस कोठडीत ठेवणे, त्याचा कबुलीजबाब नोंदवण्याची पद्धत आणि गुन्ह्याशी त्याचा थेट संबंध जोडणाऱ्या पुराव्यांचा अभाव या गंभीर बाबी आहेत. केवळ संशयाच्या आधारावर कोणालाही दोषी ठरवता येत नाही, तर पुराव्याची साखळी सिद्ध होणे आवश्यक असते, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते. २९ डिसेंबर २००६ रोजी नोएडामधील निठारी येथील मोंदिर सिंग पंढेर याच्या घरामागच्या नाल्यात मुलांचे सांगाडे सापडल्यानंतर हे धक्कादायक हत्याकांड उघडकीस आले होते. त्यानंतर झालेल्या तपासात आणखी अवशेष सापडले आणि एकूण १९ पीडितांच्या प्रकरणात १९ एफआयआर (FIR) नोंदवण्यात आले. डिसेंबर २००६ मध्येच कोळी आणि पंढेर यांना अटक करण्यात आली होती, ज्यानंतर या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे (CBI) सोपवण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार नोव्हेंबर २०२५ मध्ये कोळी तुरुंगाबाहेर आला होता. मात्र, सुटकेनंतर वर्षभरही पूर्ण न होताच हरिद्वारमध्ये त्याच्या आत्महत्येची बातमी आल्याने या देशातील सर्वात मोठ्या गुन्हेगारी प्रकरणांपैकी एका खटल्याचा असा अनपेक्षित अंत झाला आहे.

## महाराष्ट्रात 13 जिल्ह्यांना यलो अलर्ट; वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज

**मुंबई :** महाराष्ट्रात १९ सप्टेंबर रोजी काही भागांत पावसाचा जोर राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १३ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला असून, या भागांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दुसरीकडे काही जिल्ह्यांना कोणताही इशारा नसला तरी हलक्या ते मध्यम सरींची शक्यता कायम आहे. मात्र, विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांत हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याचा अंदाज आहे.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. येथे काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. पालघर, ठाणे आणि मुंबई या भागांत अलर्ट नसला तरी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.



**उत्तर महाराष्ट्रात वादळी पावसाचा अंदाज :** धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता असून, काही भागांत यलो अलर्ट लागू आहे. वादळी वातावरणासह ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

**पुणे-साताऱ्यातही यलो अलर्ट :** पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत हलका ते मध्यम पाऊस, तसेच काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर येथे अलर्ट नसला तरी पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडू शकतात.

**मराठवाड्यात चार जिल्ह्यांना अलर्ट :** छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, नांदेड आणि लातूर या चार जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि पावसाचा अंदाज आहे. जालना, परभणी, बीड आणि धाराशिव येथे अलर्ट नसला तरी काही ठिकाणी पाऊस होऊ शकतो.

**विदर्भात हवामान कोरडे राहणार :** अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या ११ जिल्ह्यांत १९ सप्टेंबरला हवामान मुख्यतः कोरडे राहण्याचा अंदाज आहे. या भागांत मोठ्या पावसाची शक्यता नाही.

**नागरिक आणि शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी :** यलो अलर्ट असलेल्या भागांत वादळी वातावरणाच्या वेळी नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. विजांचा कडकडाट सुरू असताना झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबणे टाळावे. शेतकऱ्यांनीही स्थानिक हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीची कामे आणि फवारणीचे नियोजन करावे.

**टीप:** हवामानाचा जिल्हानिहाय अंदाज बदलू शकतो. त्यामुळे प्रवास किंवा शेतीच्या कामांपूर्वी IMDचे ताजे अपडेट तपासणे योग्य ठरेल. सध्या IMDच्या १८ सप्टेंबरच्या अधिकृत उपविभागीय माहितीनुसार पुढील दिवसांसाठी काही भागांत मेघगर्जना/पावसाचे इशारे बदलत आहेत.

## 'वॉरेन बफे' अध्यक्षपदावरून पायउतार; बर्कशायर हॅथवेची सूत्रं आता मुलाकडे सुपूर्द



**नवी दिल्ली :** जगप्रसिद्ध गुंतवणूकदार वॉरेन बफे यांनी तब्बल सहा दशकांहून अधिक काळ नेतृत्व केलेल्या बर्कशायर हॅथवेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आता सोडली आहे. कंपनीने १८ सप्टेंबर २०२६ रोजी याबाबत अधिकृत घोषणा केली. ९६ वर्षीय बफे यांना यापुढे 'Chairman Emeritus' अर्थात मानद अध्यक्षाची भूमिका देण्यात आली असून, ते संचालक मंडळावर कायम राहणार आहेत. दरम्यान, दीर्घकाळापासून आखलेल्या उत्तराधिकारी नियोजनानुसार त्यांचे पुत्र हॉवर्ड जी. बफे यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत.

**बफे यांची नवी भूमिका काय? :** Chairman Emeritus म्हणून बफे कंपनीच्या बोर्डावर कायम राहतील आणि त्यांच्या अनुभवाचा, निर्णयक्षमतेचा व दृष्टिकोनाचा बर्कशायरला यापुढेही लाभ मिळणार आहे. कंपनीच्या दीर्घकालीन उत्तराधिकारी नियोजनानुसार हा बदल करण्यात आला आहे. सुसान डेकर प्रमुख स्वतंत्र संचालक म्हणून आपल्या भूमिकेत कायम राहतील.

**हॉवर्ड बफे यांच्याकडे अध्यक्षपद :** वॉरेन बफे यांचे ७१ वर्षीय पुत्र हॉवर्ड बफे १९९३ पासून बर्कशायर हॅथवेच्या संचालक मंडळावर आहेत. दीर्घकाळापासून आखलेल्या उत्तराधिकार योजना (succession plan) नुसार आता त्यांच्याकडे बोर्डाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मात्र कंपनीचे दैनंदिन कामकाज CEO ग्रेग एबल यांच्या नेतृत्वाखाली सुरू राहणार आहे. बर्कशायर हॅथवेचे CEO ग्रेग एबल यांनी बफे यांच्या योगदानाचे कौतुक करताना, त्यांनी उभारलेली कंपनीची संस्कृती आणि मूल्ये यापुढेही बर्कशायरच्या केंद्रस्थानी राहतील, असं म्हटलं. हॉवर्ड बफे या मूल्यांचं जतन करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**१९६५ मध्ये घेतली होती बर्कशायरची सूत्रं :** वॉरेन बफे यांनी १९६५ मध्ये बर्कशायर हॅथवेची सूत्रं हाती घेतली, तेव्हा कंपनी प्रामुख्याने संघर्ष करणारी वस्त्रोद्योग कंपनी होती. पुढील सहा दशकांत त्यांच्या नेतृत्वाखाली तिचं रूपांतर विमा, ऊर्जा, रेल्वे, उत्पादन, सेवा आणि किरकोळ व्यवसाय असलेल्या १ ट्रिलियन डॉलरहून अधिक मूल्याच्या मोठ्या उद्योगसमूहात झालं.

**CEO पदही आधीच सोडलं :** अध्यक्षपद सोडण्यापूर्वीच बफे यांनी बर्कशायरच्या CEO पदाची जबाबदारी ग्रेग एबल यांच्याकडे सोपवली होती. आता अध्यक्षपदाची जबाबदारीही हॉवर्ड बफे यांच्याकडे गेल्याने कंपनीच्या दीर्घकाळ नियोजित नेतृत्व हस्तांतरणाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे.

## थोडक्यात वार्ता

### एशियन गेम्समध्ये भारताचा डंका! मनू भाकर आणि तजिंदरपाल सिंग तूर भूषवणार ध्वजधारकाचा मान

**नवी दिल्ली :** जपानमधील नागोया येथे होणाऱ्या 'आशियाई खेळ २०२६' च्या (Asian Games 2026) भव्य उद्घाटन सोहळ्यासाठी भारताचे ध्वजधारक म्हणून डबल ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर (Manu Bhakar) आणि अनुभवी गोळाफेकपटू (शॉटपुटर) तजिंदरपाल सिंग तूर (Tajinder-pal Singh Toor) यांची निवड करण्यात आली आहे. नागोया येथील प्रसिद्ध 'पालोमा मिझुहो स्टेडियम'वर शनिवारी दुपारी २.३० ते ४.३० (भारतीय वेळेनुसार) या कालावधीत हा दिमाखदार सोहळा पार पडणार आहे. येत्या ४ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे ५०० हून अधिक खेळाडू तब्बल ३७ विविध खेळांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये एकाच वेळी दोन पदके जिंकून भारतीय क्रीडा जगतात नवा इतिहास रचणारी मनू भाकर भारतीय पथकाचे नेतृत्व करेल. तिने १० मीटर एअर पिस्तूल वैयक्तिक तसेच मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदके पटकावली होती. याशिवाय हँगझोऊ आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या २५ मीटर पिस्तूल संघातही तिचा सहभाग होता. दुसरीकडे, तजिंदरपाल सिंग तूर याने पुरुष गोळाफेक प्रकारात सलग दोन आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला आहे. यावेळी सलग तिसऱ्यांदा सुवर्ण पटकावून आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा त्याचा प्रयत्न असेल. हँगझोऊ येथे झालेल्या गेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने २८ सुवर्णपदकांसह तब्बल १०७ पदके जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली होती. या वेळी नागोयामध्ये हा विक्रम मोडून पदकांची संख्या आणखी वाढवण्याचा निर्धार भारतीय ॲथलीट्सने केला आहे. विशेष म्हणजे भारतीय पुरुष व महिला क्रिकेट संघ, कबड्डी संघ आणि पुरुष हॉकी संघ या स्पर्धेत गतविजेते (चॅम्पियन) म्हणून मैदानात उतरणार आहेत. या क्रीडा महोत्सवात आशियातील ४५ देशांमधील हजारो खेळाडू ४३ खेळांमध्ये आमनेसामने असतील.

### कृषी पर्यटन कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर, :** जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालयामार्फत कृषी पर्यटन कार्यशाळेचे आयोजन शनिवार, दि. २६ रोजी करण्यात आले आहे. ही कार्यशाळा विद्यानंद कृषी पर्यटन केंद्र, करोडी टोलनाक्याजवळ, सोलापूर-धुळे महामार्ग जि. छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी साडेदहा वा.होणार आहे. कार्यशाळेस विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांच्यासह पर्यटन व कृषी पर्यटन क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला व्यापक प्रसिद्धी मिळवून देणे, पर्यटनस्थळांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे तसेच पर्यटनाबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. कार्यशाळेत कृषी पर्यटनासह पर्यटन विभागाच्या विविध योजना व पर्यटन क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पर्यटनप्रेमी, कृषी पर्यटन व्यावसायिक तसेच संबंधितांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पर्यटन संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालयाने केले आहे.

### एकाच दिवशी 25 ठिकाणी रोजगार मेळावा

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (जिमाका)- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत राज्यभर एकाच दिवशी रोजगार महाकुंभ हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत मंगळवार दि.२९ रोजी जिल्ह्यात २५ ठिकाणी रोजगार मेळावे आयोजीत करण्यात आले आहेत. या मेळाव्यात सहभागी होऊन रोजगाराची संधी प्राप्त करावी,असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हात अथवा परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे तसेच शासन, उद्योग/आस्थापना आणि रोजगार इच्छुक युवक-युवतींना एकाच सामायिक व्यासपीठावर आणणे या उद्देशाने हे मेळावे आयोजीत करण्यात येत आहेत.

## 'मी गावी आलो, दिल्लीत किंवा लंडनला गेलो तरी विरोधकांना पोटदुखीच' : एकनाथ शिंदे

**सातारा :** गणेशोत्सवाच्या निमित्ताने आपल्या 'दरे' या मूळ गावी पोहोचलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजकीय विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे. मी गावी आलो, दिल्लीला गेलो किंवा लंडनच्या दौऱ्यावर गेलो, तरी विरोधकांच्या पोटात उगाचच दुखायला लागते. त्यामुळे आता या राजकीय 'पोटदुखी'वर औषध म्हणून एखादे झाड शोधावे लागेल किंवा त्यांना थेट 'जमाल गोटा'च द्यावा लागेल, अशा शब्दांत त्यांनी फिरकी घेतली. टीका टिप्पणीला आरोपांनी नव्हे, तर प्रत्यक्ष काम करूनच उत्तर देणे योग्य ठरेल, कारण मी केवळ कामाचा माणूस आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मी कोणत्याही कारणाने नाराज नसून केवळ सणाच्या निमित्ताने गावी आलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जागतिक बांबू लागवड दिनाचे औचित्य साधून शिंदेंनी आपल्या शेतात बांबूची लागवड केली. याप्रसंगी बोलताना त्यांनी बांबूच्या वाढत्या महत्त्वाची माहिती दिली. बांबूचा उपयोग आता केवळ साध्या वस्तूंसाठी उरलेला नसून त्यापासून इथेनॉल निर्मिती, विमानतळांचे बांधकाम आणि इतर अनेक उपयुक्त वस्तू बनविल्या जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी बांबूच्या लागवडीवर विशेष लक्ष केंद्रित केले पाहिजे, असा सल्ला त्यांनी दिला. शिंदेंनी आपल्या शेतात कृषी क्षेत्रातील नवनवीन प्रयोग केले असून, त्यात सफरचंद आणि ब्ल्यू बेरीच्या यशस्वी उत्पादनानंतर आता कापूर आणि हिंगाच्या रोपांची नवीन लागवड केली आहे. विशेष म्हणजे, आजवर परदेशातून आयात करावी लागणारी ब्ल्यू बेरी आता महाराष्ट्राच्या मातीत पिकवता येऊ शकते, हे त्यांनी आपल्या प्रयोगातून सिद्ध करून दाखवले आहे. राज्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर बोलताना त्यांनी सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. ज्या भागात पावसाच्या ओढीमुळे किंवा दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाले आहे आणि पिके करपून गेली आहेत, तिथे तातडीने पंचनामे करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. संबंधित जिल्ह्यांचे पालकमंत्री सध्या या बाधित क्षेत्रांची पाहणी करत असून, आपण स्वतः लवकरच या दुष्काळी भागांचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिले.


## वृद्धाची गुलशन बाग परिसरात चाकूभोसकून निर्घृण हत्या
### स्थानिक गुन्हे शाखा व नानलपेठ पोलिसांनी आरोपींना घेतली ताब्यात

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:**-ऐन सणासुदीच्या काळात व जिकडे तिकडे सणाची धावपळ असतानाच शहरातील गुलशन बाग परिसरात कौटुंबिक वादातून वयोवृद्ध म्हाताऱ्याच्या पोटात चाकूने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली.

सदरील घटना दिनांक 17 सप्टेंबर गुरुवार रोजी सकाळी साडेआठ वाजता च्या सुमारास घडलीं. या प्रकरणातील आरोपींना स्थानिक गुन्हा शाखा पथक आणि नानलपेठ पोलिसांनी अवघ्या अर्ध्या तासातच ताब्यात घेतले.

याविषयी पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की शहराच्या मध्यभागी असलेला गुलशन बाग परिसरातील मरी माता मंदिर जवळ फिर्यादी संतोष करणलाल जयस्वाल वडील, चुलते त्रिभुवन चुलती.रेखा, आई आशाबाई एकत्र राहत होते तसेच फिर्यादीचे दुसरे चुलते गोवर्धन जयस्वाल हे आजारी असल्याने त्यांना घराबाहेर हाकलून दिले होते त्यामुळे गेल्या दोन वर्षापासून ते शहरातील संभाजी नगरात एकटेच राहत होते काही दिवसापूर्वी गोवर्धन जयस्वाल आजारी पडल्याने त्रिभुवन जयस्वाल यांनी पत्नी अरुणा, मुलगा यश, दीपक मुलगी अमृता, दिव्या यांना कळवले मात्र मुलगा दीपक याने वडील गोवर्धन यांच्याशी आमच्या काही संबंध नाही त्यांना तसेच मरू द्या म्हणून सांगितले मात्र 16 सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता मृत्यू झाला व पोलिसांनी दीपक जयस्वाल यांना तुमचे वडील गोवर्धन जयस्वाल यांचा मृत्यू झाल्याचे कळविले त्यानंतर रात्री दीपक जयस्वाल यांनी फोन करून तुम्ही माझ्या वडिलांना दवाखान्यात का ॲडमिटकेले म्हणून शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत त्रिभुवन यांनी नानलपेठ पोलीस ठाण्यामध्ये तक्रारी दिली आहे 17 सप्टेंबर गुरुवार रोजी सकाळी साडेआठ वाजता च्या सुमारास दीपक जयस्वाल एस जयस्वाल संजय जयस्वाल कृष्णा जयस्वाल अरुणा जयस्वाल अमृता जयस्वाल दिव्या जयस्वाल किरण मोदी यांनी फिर्यादी संतोष जयस्वाल यांच्या घरी येऊन शिवीगाळ करायला सुरुवात केली यावेळी दीपक यश यांनी करणलाल जयस्वाल यांच्या पोटात छातीवर चाकूने वार केले तसेच फिर्यादीवरही चाकूने वार केले या हल्ल्यात करणलाल जयस्वाल यांचा जागीच मृत्यू झाला व संतोष जयस्वाल जखमी झाले आहेत याप्रकरणी संतोष जयस्वाल यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नाना पेठ पोलीस ठाण्यात आठ जनाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे या प्रकरणात स्थानिक गुना शाखेचे पथक आणि नाना पेठ पोलिसांनी संयुक्त कारवाई करत आरोपींना अर्ध्या तासात ताब्यात घेतले आहे पुढील तपास नानल पेठपोलीस करत आहेत.




## पाकिस्तान हादरले ! नमाजावेळी मशिदीजवळ भीषण स्फोट; 16 जणांचा मृत्यू

नवी दिल्ली : पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील कोहाट जिल्ह्यात शुक्रवारच्या नमाजावेळी भीषण स्फोट झाला. जुन्या पोलीस लाइन्सजवळील मशिदीजवळ झालेल्या या स्फोटात किमान 16 जणांचा मृत्यू, तर 50 हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. शुक्रवारी, 18 सप्टेंबर रोजी नमाजासाठी मोठ्या संख्येने नागरिक मशिदीत जमले होते. त्याचवेळी पोलीस लाइन्स परिसरात जोरदार स्फोट झाला. स्फोटानंतर परिसरात एकच



खळबळ उडाली. जखमींना तातडीने कोहाट जिल्हा मुख्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्फोटाची तीव्रता मोठी असल्याने मशिदीच्या बाहेरील भागाचे मोठे नुकसान झाले. एका भिंतीचा भाग कोसळला असून स्फोटामुळे घटनास्थळी मोठा खड्डाही पडला. आसपासच्या इमारतींचेही नुकसान झाल्याची माहिती आहे. स्फोटानंतर बचाव पथके आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले. जखमींना रुग्णालयात हलवण्यात आले असून कोहाटच्या जिल्हा रुग्णालयात आपत्कालीन परिस्थिती जाहीर करण्यात आली.

ताज्या वृत्तांनुसार, मृतांमध्ये नागरिकांसोबत पोलीस कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. काही अहवालांनुसार या हल्ल्यात पाच पोलीस कर्मचारी आणि 11 नागरिकांचा मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, स्फोट हा स्फोटकांनी भरलेल्या वाहनाशी संबंधित असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. स्फोटानंतर परिसरात गोळीबाराचीही माहिती समोर आली असून सुरक्षा दलांनी परिसराला घेराव घातला आहे.

हल्ल्याची जबाबदारी अद्याप कुणी स्वीकारली नाही

या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने स्वीकारलेली नाही. स्फोटामागील नेमके कारण, हल्लेखोर आणि त्यामागील सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणांकडून तपास सुरू आहे. घटनेनंतर परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून कोहाट-हांगू मार्गावरील वाहतूकही बंद करण्यात आल्याची माहिती आहे. हा एक विकसित होत असलेला प्रकार असून मृतांचा आणि जखमींचा आकडा बदलू शकतो.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## अन्नसुरक्षेचा बोजवारा आणि ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ

महाराष्ट्रामध्ये सध्या सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) अधिकारी कमालीचे सक्रिय झाले असून, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या गैरप्रकारांवर वचक बसवण्यासाठी राज्यभरात धडक कारवाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगरसह प्रमुख शहरांमधील हॉटेल, रेस्टॉरंट, डेअरी आणि मिठाईच्या दुकानांवर छापे टाकून अन्नसुरक्षेच्या नियमांची कसून तपासणी केली जात आहे. विशेषतः सणासुदीच्या काळात खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणे किंवा अस्वच्छ वातावरणात अन्न तयार करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर समोर येत असून, नागरिकांच्या आरोग्याची सुरक्षितता ऐरणीवर आली आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे खाद्यान्न व्यवसायातील अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला आहे. अशाच एका कारवाईदरम्यान पुण्यातून अत्यंत संतापजनक आणि किळसवाणी बाब समोर आली आहे. पुण्यातील एका प्रतिष्ठीत आणि उच्चभ्रू वर्तुळात वावरणाऱ्या 'द न्यू पुना क्लब'च्या स्वयंपाकघरात अन्नाची प्रचंड अस्वच्छता आढळून आल्यामुळे एफडीएकडून त्यांचा अन्न परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला आहे. या क्लबच्या स्वयंपाकघरात आणि अन्न साठवणूक करणाऱ्या कपाटांमध्ये जिवंत झुरळे, किटकांची रांग आणि उंदराची विष्ठा आढळल्याने तपासणी करणारे अधिकारीही चक्रावले. इतकेच नव्हे तर, स्वयंपाकघराच्या भिंती व ओट्यांवर तेलाचे जाड थर साचलेले, अनेक ठिकाणी सांडपाणी तुंबलेले आणि अगदी किचनजवळच अस्वच्छ शौचालय असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अनेक उच्चभ्रू मंडळी आणि प्रतिष्ठित नागरिक नित्यनेमाने जेवण्यासाठी येणाऱ्या या क्लबमध्ये ग्राहकांच्या जीवाशी किती निकृष्ट पातळीवर खेळ सुरू होता, हे यावरून स्पष्ट होते. अन्नसुरक्षा कायद्यातील 'शेड्यूल ४' मधील मूलभूत नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यावर प्रशासनाने कोणतीही दयामाया न दाखवता ही कठोर कारवाई केली आहे. फक्त हा एकच क्लब नव्हे, तर राज्यभरात मिठाई, दूध, दुग्धजन्य पदार्थ, खवा, खाद्यतेल आणि बेकरी उत्पादनांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी व्यापक मोहीम राबवली जात आहे. खाद्यपदार्थांच्या पाकिटांवर ग्राहकांची दिशाभूल करणारे मजकूर छापल्याचे निदर्शनास आल्यास किंवा भेसळयुक्त पदार्थ विकले जात असल्याचे आढळल्यास एफडीएकडून तात्काळ परवाने रद्द केले जात आहेत काही ठिकाणी दुकानदारांना ताकीद देत सामानाचा दर्जा सुधारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, केवळ सणासुदीच्या काळातच नव्हे तर वर्षभर अशा प्रकारच्या कारवाया नियमितपणे आणि अधिक कठोरपणे राबवण्याची गरज आहे, जेणेकरून अन्न सुरक्षेचे नियम पायदळी तुडवणाऱ्या व्यावसायिक आणि आस्थापनांवर वचक निर्माण होईल आणि सामान्यांच्या आरोग्याशी खेळण्याचे धाडस कोणी करणार नाही.

## उपजिल्हा रुग्णालयात मराठवाडा मुक्ती दिन साजरा

**गंगापूर प्रतिनिधी :** गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला येथील ध्वजारोहण डॉ. सुधाकर मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत मराठवाड्याच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व बलिदानाला अभिवादन केले. यावेळी अतुल रासकर सदस्य रुग्ण कल्याण समिती यांनी उपस्थित राहून स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. रुग्णालयातील सर्वसामान्य, गोरगरीब आणि गरजू रुग्णांना योग्य उपचार, आवश्यक मार्गदर्शन आणि संवेदनशील सेवा मिळावी, यासाठी रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका यावेळी अधोरेखित करण्यात आली. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची प्रेरणा घेऊन जनतेची सेवा आणि रुग्णांची सेवा अधिक प्रभावीपणे करण्याचा संकल्प हीच या दिनाची खरी प्रेरणा असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.उपस्थित अधिकारी व कर्मचारी यावेळी डॉ. सुधाकर मुंडे, अतुल रासकर – सदस्य, रुग्ण कल्याण समिती, डॉ. सूर्यवंशी, डॉ. केंद्रे, डॉ. मनोरे, डॉ. शेजूळ, डॉ. म्हस्के, सिस्टर कुलकर्णी, रुकसाना शेख, बेबी शेख, वाघ सिस्टर, पवार सिस्टर, तपसे सिस्टर, मंगेश गायकवाड, साबळे, अनिल साळुंके, मोहिते, दळे सिस्टर, लोंढे, किशोर हिवाळे आदी रुग्णालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पर्जन्यमानाची स्थिती अद्याप हवी तशी सुधारली नाही; पीक परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवा: विनय गौडा



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात पर्जन्यमानाची स्थिती अद्यापही हवी तशी सुधारलेली नाही. यामुळे कृषी, महसूल, ग्रामविकास आणि अन्य सर्व संबंधित यंत्रणांनी पर्जन्यमान व पीक स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील पीक स्थिती आणि अनियमित पर्जन्यमानामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आज जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर आढावा घेतला. या दौऱ्यादरम्यान, जिल्हाधिकारी गौडा यांनी खडकनारळा ता. गंगापूर येथे जाऊन प्रत्यक्ष पिकांची पाहणी केली व परिस्थितीची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, मनपा उपायुक्त अंकुश पांढरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सध्याच्या वस्तुस्थितीनुसार जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यापर्यंत ४१७.३ मिमी इतके पर्जन्यमान झाले असून, कमी पावसामुळे प्रामुख्याने कापूस, मका आणि सोयाबीन या पिकांवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, दिलासादायक बाब म्हणजे जिल्ह्यात पशुधनासाठी सध्या चारा पुरेसा उपलब्ध असून, येत्या १० मार्च २०२७ पर्यंत पुरेल इतका चारा शिल्लक असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. तसेच जलसाठ्याचा आढावा घेतला असता, जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पांमध्ये २९.९५ टक्के, तर ९९ लघु प्रकल्पांमध्ये ३४.८८ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. याशिवाय, जायकवाडी या सर्वात मोठ्या प्रकल्पात यंदा अद्यापपर्यंत ८६.७९ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. यंदाची पर्जन्यमानाची स्थिती पाहता पिकांच्या स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याची आवश्यकता असून, त्याबाबत सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहावे, अशा कडक सूचना जिल्हाधिकारी गौडा यांनी दिल्या आहेत.

# नागरिकांना उत्तम दर्जेदार आरोग्यसेवा सुविधा मिळण्यावर भर



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी -माननीय आरोग्य राज्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न बैठकीत सार्वजनिक आरोग्य विभागातील सेवा बाबत महत्त्वपूर्ण निर्णय राज्यस्तरीय आढावा बैठक संपन्न.

: राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, दर्जेदार व गुणात्मक करण्याच्या उद्देशाने माननीय आरोग्य राज्यमंत्री तथा पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय व्हिडिओ कॉन्फरन्स बैठक आयोजन झाले. सदर बैठकीत आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक श्री. संजय श्रीपतराव काटकर, राज्यातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक,सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, यांची उपस्थिती होती

. या बैठकीत राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे,ग्रामीण आरोग्य व्यवस्था, बाल आरोग्य सेवा, आपत्कालीन सेवा, मनुष्यबळ तसेच विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत माननीय आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर यांनी महत्त्वपूर्ण सूचना देण्यात दिल्या

राज्यात नागरिकांना त्यांच्या जवळच्या आरोग्य संस्थेत तातडीने व गुणवत्तापूर्ण उपचार मिळावेत, यासाठी राज्यभरात डे-केअर सेंटर सुरू करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच आपत्कालीन वैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्यासाठी नवीन १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १०० टक्के बालकांची तपासणी

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत राज्यातील १०० टक्के पात्र बालकांची आरोग्य तपासणी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. अंगणवाडी,जिल्हा परिषद शाळा तसेचआश्रमशाळांमधील बालकांची तपासणी प्रभावीपणे पूर्ण करून तपासणीदरम्यान आढळणाऱ्या आरोग्य समस्यांवर आवश्यक उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या

१,४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती

आरोग्य विभागातील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी राज्यभरात १,४४० नवीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती करण्यात येणार असून,संबंधित प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

यामुळे विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाबाबत लवकर आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. आरोग्य विभागातील उपलब्ध मनुष्यबळाचा प्रभावी वापर करून नागरिकांना सातत्यपूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे ही ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची प्रमुख केंद्रे असल्याने येथे नागरिकांना आवश्यक त्या सर्व आरोग्य सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोग्य विभागाच्या १३ महत्त्वपूर्ण सेवा जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातून प्रत्येक घरापर्यंत उपलब्ध करून देण्याबाबत विशेष भर देण्यात आला.

प्राथमिक आरोग्य केंद्रांवर नियुक्त असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्य करून नागरिकांना नियमित व तत्पर आरोग्यसेवा द्यावी,असे स्पष्ट निर्देश देण्यात आले.अधिकाऱ्यांनी आरोग्य संस्थांमध्ये मनुष्यबळ,औषधसाठा, वैद्यकीय उपकरणे आणि आवश्यक सेवा उपलब्ध आहेत की नाहीत,याचा नियमित आढावा घेण्याचेही निर्देश देण्यात आले.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून राज्यभरात ग्रामीण भागातील नागरिकांना प्रत्येक घरापर्यंतआरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात. अभियानात राज्यभरात क्षय रुग्णांची तपासणी, नेत्र तपासणी, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया,रक्तदान शिबिर आयोजन करण्यात यावे. रुग्णांना त्वरितसंदर्भ सेवा,मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, गुणात्मक स्वरूपात देण्यात याव्यात याबद्दल माननीय मंत्री महोदय यांनी सूचना दिल्या

'तीस वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' अभियान प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश

राज्यात राबविण्यात येत असलेल्या 'तीस वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' या अभियानाची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.पात्र नागरिकांची आवश्यक तपासणी करून आजारांचे लवकर निदान, वैद्यकीय सल्ला, उपचार तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारांसाठी संदर्भित करण्यात यावे.

प्रत्येक जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कृती आराखडा तयार करून त्याची नियमित समीक्षा करावी,असे निर्देश देण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय सेवा उपलब्धता,मनुष्यबळ, औषधसाठा,उपकरणे, रुग्णवाहिका सेवा, बाल आरोग्य तपासणी तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.नागरिकांना वेळेवर,सुलभ,दर्जेदार आणि गुणात्मक आरोग्यसेवा मिळणे हे आरोग्य विभागाचे प्रमुख उद्दिष्ट असून, त्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने कार्य करून शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रचार व प्रसार करावा, असे मा.आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी व्हीडिओ कॉन्फरन्स बैठकीमध्ये मध्ये सुचित केले.

# जिल्ह्यात २५ सप्टेंबरपासून केवळ 'एफएफएस' अँपद्वारे खत विक्री

## शेतकरी आता घरबसल्या करू शकणार क्यूआर कोडद्वारे खताचे बुकिंग

हिंदु प्रकाश वार्ता /परभणी

**परभणी:** केंद्र शासनाने शेतकऱ्यांना अनुदानित रासायनिक खतांची खरेदी सुलभ, पारदर्शक आणि जलदगतीने करता यावी, यासाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' (एफएफएस) ही मोबाईल आधारित प्रणाली विकसित केली आहे. परभणी जिल्ह्यात २५ सप्टेंबर २०२६ पासून खत विक्रीची अंमलबजावणी केवळ मोबाईल अँपव्दारे करण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील सुमारे ८५० खत विक्रेत्यांना आवश्यक सूचना देण्यात येणार असून, सर्व शेतकऱ्यांनी या प्रणालीचा वापर करण्यासाठी पूर्वतयारी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या मोबाईलवरून खताची आवश्यकता नोंदवून पूर्व-बुकिंग करता येणार आहे. शेतकऱ्याच्या जमिनीचे क्षेत्रफळ आणि पिकाच्या आधारे खताची शिफारस केलेली मात्रा अँपमध्ये उपलब्ध होईल. त्यानुसार आवश्यक खत आणि जवळचा अधिकृत विक्रेता निवडल्यानंतर अर्ज सादर करता येईल. बुकिंग यशस्वी झाल्यानंतर मोबाईलवर युनिक क्यूआर कोड व टोकन क्रमांक प्राप्त होईल.

तीन दिवसांत क्यूआर कोड दाखवून खत खरेदी

शेतकऱ्याने अधिकृत खत विक्रेत्याकडे मोबाईलवरील QR कोड दाखविल्यानंतर e-POS मशीनद्वारे पावतीसह खत प्राप्त करता येईल. प्राप्त QR कोडच्या आधारे तीन दिवसांच्या आत खत खरेदी करता येणार आहे. त्यामुळे खत दुकानांवरील गर्दी व लांबच लांब रांगा कमी होण्यास मदत होईल.

एफएफएस अँपमुळे शेतकऱ्यांना रांगेत उभे राहण्याची गरज नाही. पूर्व-नोंदणी व बुकिंगमुळे खत दुकानांवरील गर्दी कमी होईल. कृत्रिम तुटवड्याला आळा बसणार असून, युरिया, डीएपी यांसारख्या आवश्यक खतांचा काळाबाजार व कृत्रिम तुटवडा रोखण्यास मदत होईल. जमिनीचे क्षेत्रफळ व पिकाच्या गरजेनुसार खताच्या शिफारस केलेल्या मात्रेची माहिती मिळेल. तसेच शेतकऱ्यांना मोबाईलवरून घरबसल्या खताचे बुकिंग करता येईल. या अँपमुळे बुकिंग, विक्रेता आणि खत वितरणाची प्रक्रिया अधिक पारदर्शक होण्यास मदत होईल.

'Google Play Store'वरून FFS अँप डाउनलोड करा

'Framework for Fertilizer Sale (Ministry of Agriculture)' हे मोबाईल अँप Google Play Store वरून डाउनलोड करून शेतकऱ्यांनी स्वतःची नोंदणी करावी. त्यानंतर पिकाची माहिती व आवश्यक खतांची मागणी नोंदवून पूर्व-बुकिंग करता येईल.

खत खरेदीची टप्पानिहाय प्रक्रिया

**टप्पा १ – अँप डाउनलोड :** स्मार्टफोनमध्ये FFS मोबाईल अँप डाउनलोड करून नोंदणी करावी.

**टप्पा २ – पूर्व-नोंदणी व बुकिंग :** पिकाची माहिती आणि आवश्यक खतांची मागणी नोंदवून पूर्व-बुकिंग पूर्ण करावे.

**टप्पा ३ – QR कोड प्राप्त करा :** बुकिंग यशस्वी झाल्यानंतर प्राप्त झालेला QR कोड व टोकन क्रमांक मोबाईलमध्ये जतन करावा.

**टप्पा ४ – खत खरेदी :** अधिकृत खत विक्रेत्याकडे QR कोड दाखवून e-POS मशीनद्वारे पावतीसह खत प्राप्त करावे.

खत विक्रेत्यांसाठीही आवश्यक पूर्वतयारी

जिल्ह्यातील सर्व वैध खत विक्रेत्यांनी आपले परवाने iFMS पोर्टलवर अद्ययावत व नूतनीकरण करून घेणे आवश्यक आहे. तसेच दुकानातील L1 e-POS मशीन कार्यरत असल्याची खात्री करावी. प्रत्यक्ष उपलब्ध खत साठा आणि POS प्रणालीवरील साठा यामध्ये तफावत राहणार नाही, याची दक्षता विक्रेत्यांनी घ्यावी.

अडचणींसाठी जिल्हा व तालुका स्तरावर हेल्पडेस्क

शेतकरी व खत विक्रेत्यांना FFS प्रणालीच्या वापरादरम्यान येणाऱ्या अडचणी व तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर हेल्पडेस्क स्थापन करण्यात येत असून, त्यांचे संपर्क क्रमांक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

परभणी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी तसेच खत विक्रेत्यांनी २५ सप्टेंबर २०२६ पासून लागू होणाऱ्या या प्रणालीचा अवलंब करून या पारदर्शक व सुलभ प्रक्रियेस सहकार्य करावे, असे आवाहन कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी आणि जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, परभणी यांनी केले आहे.

# गुरु परिवारच्या अध्यक्षपदी सुनील सेठी, सचिवपदी सावन चुडीवाल



अध्यक्ष सुनील सेठी
सचिव सावन चुडीवाल

**छत्रपती संभाजीनगर :** क्रांतिकारी राष्ट्रसंत समाधिस्त आचार्य श्री १०८ तरुणसागरजी महाराज यांच्या पावन प्रेरणेने स्थापन झालेल्या गुरु परिवार, छत्रपती संभाजीनगरच्या सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. परमपूज्य क्षुल्लक श्री पर्वसागरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली खडेलवाल दिगंबर जैन पंचायत, पार्श्वनाथ मंदिर, राजाबाजार अंतर्गत ही कार्यकारिणी गठित करण्यात आली.

नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी सुनील सुभाषचंद्र सेठी, कार्याध्यक्षपदी अनुज दगडा, उपाध्यक्षपदी पवन पाटणी, सचिवपदी सावन उमेश चुडीवाल, सहसचिवपदी गौरव कासलीवाल, कोषाध्यक्षपदी रोहित गंगवाल, तर सहकोषाध्यक्षपदी सागर पाटणी यांची नियुक्ती करण्यात आली.

तसेच सांस्कृतिक प्रमुख म्हणून कुणाल ठोले व प्रशांत काला, क्रीडा प्रमुख म्हणून प्रसाद दगडा व राकेश पांडे, जनसंपर्क प्रमुख म्हणून सचिन कासलीवाल (दादा), तर सोशल मीडिया प्रमुख म्हणून अंकुर साहूजी यांची निवड करण्यात आली. समन्वय समितीमध्ये जीतू गंगवाल, प्रवीण लोहाडे, अशोक अजमेरा व पप्पू (महेंद्र) ठोले यांचा समावेश करण्यात आला.

आचार्य श्री १०८ तरुणसागरजी महाराज यांचा सन २००८ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे चातुर्मास झाला होता. याच काळात त्यांच्या प्रेरणेतून गुरु परिवार सामाजिक संघटनेची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून गुरु परिवाराच्या माध्यमातून शहरात विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच आरोग्यविषयक उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते.

नूतन कार्यकारिणीच्या निवडीवेळी माजी अध्यक्ष विजय चांदीवाल यांनी मागील दोन वर्षांचा कार्यकाळ व लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांनी आचार्य श्री तरुणसागरजी महाराज यांच्या विचार, संस्कार आणि सेवा भावनेला पुढे नेत गुरु परिवाराच्या माध्यमातून समाजात एकता, सेवा, संस्कार आणि सामाजिक उत्थानासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी गुरु परिवाराचे सर्व सदस्य उपस्थित होते. नूतन कार्यकारिणीचे सकल जैन समाजाच्या वतीने अभिनंदन करून आगामी कार्यासाठी मंगल शुभेच्छा देण्यात आल्या.

# एमजीएममध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन; अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर गांधीवादी विचारांवर निबंध स्पर्धा

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ : महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रसार, नव्या पिढीमध्ये वैचारिक प्रगल्भता निर्माण करणे आणि समकालीन सामाजिक प्रश्नांकडे गांधीवादी दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता विकसित करणे, या उद्देशाने महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन' अंतर्गत निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ८ आणि ९ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या साहित्य संमेलनाचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

महात्मा गांधी यांनी 'माझे जीवन हाच माझा संदेश' या विचारातून संपूर्ण जगाला अहिंसा, सत्य आणि शांततेचा मार्ग दाखवला. आजच्या २१व्या शतकात तंत्रज्ञान आणि आधुनिकतेचा वेगाने विस्तार होत असताना कौटुंबिक, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध आव्हाने निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता अधोरेखित होत असून विद्यार्थ्यांनी या विचारांचा अभ्यास करून वर्तमान समस्यांवर चिंतन करावे, या उद्देशाने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत गांधीजींच्या विचारधारेवर प्रकाश टाकणाऱ्या तसेच आजच्या सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि लोकशाहीविषयक प्रश्नांचा वेध घेणाऱ्या एकूण १४ विषयांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये '२१व्या शतकातील गांधीवादी अहिंसेचे महत्त्व', 'जागतिक शांतता आणि गांधीजींचे विचार', 'गांधीजींची शाश्वत जीवनशैली', 'गांधीजींचे पर्यावरणविषयक विचार', 'गांधीजींची हिंद स्वराज्य संकल्पना', 'ग्रामस्वराज्य ते स्मार्ट व्हिलेज', 'ग्रामीण स्वावलंबनाची सद्यःस्थिती आणि आव्हाने', 'सत्याग्रह - आधुनिक लोकशाही चळवळीचे प्रभावी साधन', 'स्त्री-सक्षमीकरण आणि गांधीजींचे विचार', 'महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार', 'आजची पत्रकारिता आणि गांधीजी', 'जागतिक गाव - दृष्टिकोन आणि आचरण', 'लोकशाही तत्त्व आणि आचरण' तसेच 'बहुलतावाद, सर्वसमावेशकता आणि राष्ट्रवाद' या विषयांचा समावेश आहे.

निबंध स्पर्धेसाठी दोन गट निश्चित करण्यात आले आहेत. शाळा गटामध्ये इयत्ता सातवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश असून, कनिष्ठ महाविद्यालय ते पदव्युत्तर पदवी गटामध्ये पंधरा वर्षांवरील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. शाळा गटासाठी निबंधाची शब्दमर्यादा ७०० ते १००० शब्द, तर कनिष्ठ महाविद्यालय ते पदव्युत्तर पदवी गटासाठी १५०० ते २००० शब्द अशी आहे. स्पर्धेतील निबंध मराठी, उर्दू, हिंदी आणि इंग्रजी या भाषांमध्ये सादर करता येणार आहेत. मराठी, उर्दू व हिंदी भाषेतील निबंधांसाठी Unicode Mangal, 11 Pt, तर इंग्रजी निबंधासाठी Times New Roman, 12 Pt आणि 1.5 लाइन स्पेसिंग वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक सहभागीने कोणत्याही एका विषयावर टाईप केलेला निबंध सादर करावा. निबंध स्वतंत्र पानावर, एका बाजूने असावा. निबंधाच्या पहिल्या पानावर पूर्ण नाव, गट, शाळा किंवा महाविद्यालयाचे नाव, मोबाईल क्रमांक व पत्ता स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी दोन्ही गटांमध्ये आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. शाळा गटातील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास ८ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ६ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास ४ हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येकी एक हजार रुपयांची पाच उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार असून, या गटासाठी एकूण २३ हजार रुपयांची पारितोषिके आहेत. कनिष्ठ महाविद्यालय ते पदव्युत्तर पदवी गटातील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ७ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास ५ हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. या गटातही प्रत्येकी एक हजार रुपयांची पाच उत्तेजनार्थ पारितोषिके असून एकूण २७ हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत.

स्पर्धकांनी आपले निबंध २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत essaycompetition@mgsindia.net या ई-मेलवर पाठवावेत. स्पर्धेचे ठिकाण एमजीएम परिसर, एन-६, सिडको, छत्रपती संभाजीनगर हे आहे. स्पर्धेची अधिक माहिती www.mgmu.ac.in आणि www.mgsindia.net या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. निबंध लेखनात कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर करू नये, अशी स्पष्ट सूचना आयोजकांनी केली आहे. निबंधातील वाङ्मयचौर्य तपासले जाणार असून, परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. ८ आणि ९ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलनात विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन गांधीवादी विचारांचा अभ्यास, चिंतन आणि लेखनातून प्रसार करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. आशा देशपांडे - ९८२३०४२००३, डॉ.भागवत वाघ - ९९२२७७३३०७ आणि डॉ.मारोती गायकवाड - ७९७२३८२५५६ यांच्याशी संपर्क साधावा.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## शिवकालीन देखाव्यात महालक्ष्मी गौराईची स्थापना
## देवगिरी व्हॅलीतील वटणे परिवाराचा आकर्षक देखावा; किल्ले, मावळे आणि शिवकालीन वस्तूंनी सजावट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी व्हॅली, मिटमिटा येथे सौ. सीमा विनोद वटणे व परिवाराच्या वतीने शिवकालीन देखाव्यात महालक्ष्मी गौराईची स्थापना करण्यात आली आहे. शिवकालीन संस्कृतीचा जागर करणाऱ्या या देखाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, मावळे तसेच त्या काळातील विविध वस्तूंची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे.




देखाव्यात शिवकालीन तांब्या-पितळेच्या भांड्यांची उतरंड, विविध पारंपरिक भांडी तसेच अन्य ऐतिहासिक वस्तू लक्षवेधी ठरत आहेत. महाराजांच्या घोड्यांची सलामी हा देखाव्याचा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

महालक्ष्मी गौराईला पारंपरिक नऊवारी काष्टा साडी परिधान करून आकर्षक साजश्रृंगार करण्यात आला आहे. पारंपरिक पद्धतीने केलेली सजावट आणि शिवकालीन वातावरणामुळे हा देखावा परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. गौराई दर्शनासाठी महिला व भाविकांचीही गर्दी होत आहे.

## श्री दत्त पंचपदीच्या वतीने पावसाला साकडे 'सांगावे कोण्या ठाया जावे...'च्या पदाच्या सामूहिक गजराने देवा कडे प्रार्थना



**जिंतूर, प्रतिनिधी :** तालुक्यात मागील दीड महिन्यापासून पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिंतूर येथील श्री दत्त पंचपदीच्या वतीने गुरुवारी रात्री पावसासाठी सामुदायिक प्रार्थना करण्यात आली.

यावेळी करुणात्रिपदीसह 'सांगावे कोण्या ठाया जावे, कोणाचे स्मरावे' या पदाचा सामूहिक गजर करण्यात आला. वरुणराजाने कृपादृष्टी करून सर्वत्र समाधानकारक पाऊस पडावा, शेतकरी व सर्वसामान्यांवरील संकट दूर व्हावे, अशी प्रार्थना करण्यात आली. प्रसंगी ॲड. योगेश बळीराम उन्हाळे यांनी सामूहिक प्रार्थनेचे महत्त्व पटवून करुणात्रिपदीतील पदांचा आध्यात्मिक भावार्थ उपस्थितांना सांगितला. सामूहिक प्रार्थनेमुळे संकटाच्या काळात आशा, सकारात्मकता आणि सामाजिक एकोपा दृढ होतो, असे त्यांनी नमूद केले.

## पिंपरी सताळ येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शालेय साहित्य विद्यार्थ्यांना वाटप



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी पिंपरी सताळ तालुका फुलंब्री येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप यात वह्या रजिस्टर पेन बसण्याच्या चटाया झाडे लावण्यासाठी कुंड्या साहित्य वाटप या गावाचे भूमिपुत्र उद्योजक सुभाष बांबर्डे पाटील . ह भ प नारायण बांबर्डे महाराज पो पा पांडुरंग पवार गणेश पवार रामेश्वर पवार त्र्यंबक जंजाळ लक्ष्मण बांबर्डे रामदास बांबर्डे कृष्णा जाधव नारायण देवरे पंढरीनाथ देवरे शैलेश जाधव सिताराम जंजाळ शिवाजी देवरे शामराव पा देवरे गडकरी गुरुजी शंकर पवार रामदास पवार कृष्णा पवार कैलास बांबर्डे आदींच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

## राजकुंवर महाविद्यालयात अभियंता दिन उत्साहात साजरा

आधुनिक भारताचे शिल्पकार भारतरत्न डॉ. एम विश्वेश्वरैया यांना अभिवादन

**फर्दापूर :** राजकुंवर महाविद्यालय धनवट फर्दापूर येथे आधुनिक भारताचे शिल्पकार आणि महान अभियंता भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचा जन्मदिवस म्हणजेच 'राष्ट्रीय अभियंता दिन Engineer s Day अतिशय उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला

या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए जे बेडवाळ उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक म्हणून विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा योगेश पाटील यांची मंचावर उपस्थिती होती

याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी डॉ. विश्वेश्वरैया यांच्या अभियांत्रिकी क्षेत्रातील अफाट योगदानावर आणि देशाच्या उभारणीतील त्यांच्या कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांनी त्यांच्या दूरदृष्टी आणि कार्यातून प्रेरणा घ्यावी तसेच विज्ञान व तंत्रज्ञानाच्या Science and Technology क्षेत्रात नवनवीन शोध लावून स्वत ची आणि देशाची प्रगती साधावी असे आवाहन प्रा योगेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना केले

या कार्यक्रमाचे अत्यंत बहारदार आणि नियोजनबद्ध सूत्रसंचालन प्रा शेळके सर यांनी केले तर कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार प्रा माधुरी सपकाळ मॅडम यांनी मानले

या ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची हर्सुल घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला अभ्यासपूर्ण भेट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** देशव्यापी 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या (NSO) क्षेत्र संकार्य प्रभागाच्या संयुक्त विद्यमाने हर्सुल येथील महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला अभ्यासपूर्ण क्षेत्रभेट देण्यात आली. या भेटीत कचऱ्याचे वैज्ञानिक पद्धतीने वर्गीकरण, प्रक्रिया आणि त्यापासून उपयुक्त संसाधनांची निर्मिती याची माहिती अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतली.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे संचालक तथा क्षेत्रीय प्रमुख जयप्रकाश होनराव आणि कार्यालय अध्यक्ष तथा वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी मुकेश बाबू यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या क्षेत्रभेटीत सहभाग घेतला. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे आणि उपआयुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक रेणुका गायकवाड यांनी भेटीचे समन्वयन केले.

प्रकल्पाचे प्रभारी तन्वीर यांनी उपस्थितांना घनकचरा व्यवस्थापनाच्या विविध प्रक्रियांची सविस्तर माहिती दिली. कचऱ्याचे वर्गीकरण, वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया, सेंद्रिय कचऱ्यापासून खतनिर्मिती तसेच संसाधन पुनर्प्राप्तीची प्रक्रिया यावेळी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहिली.

शहरी भागातील घनकचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, कचऱ्याचे उगमस्थानीच वर्गीकरण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या उपयुक्त संसाधनांची प्रक्रिया याबाबतही माहिती देण्यात आली. स्वच्छता व्यवस्थापनाची प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेताना अधिकाऱ्यांनी प्रकल्पाची पाहणी केली.

या प्रसंगी जयप्रकाश होनराव यांनी क्षेत्रभेटीच्या आयोजनासाठी महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी आणि प्रकल्प व्यवस्थापन टीमचे आभार मानले. स्वच्छता ही केवळ अभियानापुरती मर्यादित न राहता ती नागरिकांच्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

कचऱ्याचे उगमस्थानीच योग्य वर्गीकरण करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. 'स्वच्छता ही सेवा २०२६'च्या माध्यमातून स्वच्छता, शाश्वत कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश व्यापक करण्यासाठी अशा क्षेत्रभेटी महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

## श्री गणेश मंडळांच्या प्रांगणातून योजनांची माहिती नागरिकांपर्यंत सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचा लाभ घ्या; परभणीत 'लोकसंवाद-2026'मधून आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी




**परभणी:** सामाजिक न्याय विभागाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ विद्यार्थी व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण कार्यालयाचे अधीक्षक बी. एन. स्वामी यांनी केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयातर्फे राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६' अंतर्गत शहरातील श्री राजे शिव छत्रपती मित्र मंडळाच्या प्रांगणात जनजागृती कार्यक्रम गुरुवारी (दि.१७) घेण्यात आला. यावेळी श्री. स्वामी यांनी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली.

विद्यार्थ्यांसाठीच्या भारत सरकार शिष्यवृत्ती, आंतरराज्य व परराज्य शिष्यवृत्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, शासकीय वसतिगृह व निवासी शाळा योजना, तसेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजना, मिनी ट्रॅक्टर योजना आणि विविध महामंडळांच्या कर्ज योजनांची माहिती यावेळी देण्यात आली.

दरम्यान, अंधश्रद्धा निर्मूलनावर गणेशोत्सवातील देखावे सादर करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या आवाहनाचे पत्र मंडळाच्या अध्यक्ष व सचिवांना यावेळी देण्यात आले. कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष श्री. गायकवाड, श्री. चोपडे, वरिष्ठ संपादक मंदार कुलकर्णी व पांडुरंग अंभुरे, जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक श्री. धोंगडे यांनी केले, तर सूत्रसंचालन मंदार कुलकर्णी यांनी केले.

## अरुण चव्हाण देशमुख राष्ट्रीय संघटक यांना शहीद भगतसिंग योद्धा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित



**अजिंठा प्रतिनिधी :** अजिंठा . लातूर येथील अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या राष्ट्रीय अधिवेशनात अजिंठा येथील अरुण चव्हाण देशमुख यांना शहीद भगतसिंग योद्धा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले हा पुरस्कार राष्ट्रीय अध्यक्ष ज्येष्ठ स्वतंत्र सैनिक श्री प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर व श्री अमित आझाद तिवारी अमर शहीद चंद्रशेखर आजाद यांचे नातू यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ पुष्पहार व सन्मानपत्र देऊन देण्यात आला यावेळी उपस्थित मान्यवर खालील प्रमाणे श्री पृथ्वीराज सिंह पाटील खंडापूरकर राष्ट्रीय अध्यक्ष युवक विभाग सौ. एडवोकेट राणीताई स्वामी प्रदेशाध्यक्ष अरविंद जी कौर प्रदेशाध्यक्ष झारखंड सौ. नेहा जी तिवारी आझाद यांच्या प्रमुख उपस्थितीत शहीद भगतसिंग योद्धा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला 17/सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने व संघटनेचे सालाबाद प्रमाणे राष्ट्रीय अधिवेशन हे लातूर येथे होते यात देशातील व राज्यातील संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित असतात आणि संघटनेचे ज्या पदाधिकाऱ्याने वर्षभर संघटनेचे माध्यमातून अनेक सामाजिक व समाज हिताचे देश हिताचे कार्य करणाऱ्या देशातील व राज्यातील संघटनेचे पदाधिकारी यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते यानंतर मराठवाड्यातील दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेता संघटनेच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर ज्येष्ठ स्वतंत्र सैनिक यांच्या नेतृत्वावर जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे भव्य मोर्चा करण्यात आला संपूर्ण महाराष्ट्रात व मराठवाडा विदर्भात दुष्काळ जाहीर करावा ही मुख्य मागणी करण्यात आली या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी लातूर यांना देण्यात आले यात जिल्हाधिकारी यांनी संघटनेच्या सर्व मागण्या मान्य करून आठ दिवसात लेखी स्वरुपात आदेश देण्याचे भ्रमणध्वनीच्या माध्यमातून राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्याशी सविस्तर चर्चा केली यानंतर राष्ट्रगीताने संघटनेचा राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता करण्यात आली अरुण चव्हाण देशमुख यांना राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या बद्दल त्यांचे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे नवनिर्वाचित युवक राष्ट्रीय अध्यक्ष पृथ्वीराज सिंह पाटील खंडापूरकर एडवोकेट राणीताई स्वामी प्रदेश अध्यक्ष महिला आघाडी सौ.अंजना राजपुत प्रदेश उपाध्यक्ष महिला आघाडी मराठवाडा विभागीय अध्यक्ष गोकुळ सिंग राजपूत जिल्हा शहराध्यक्ष परमानंदजी शुक्ला लताताई त्रिवेदी मराठवाडा विभागीय अध्यक्ष महिला आघाडी सौ. उषाताई मिश्रा जिल्हा शहर अध्यक्ष किशोरजी शिंदे विभागीय अध्यक्ष मराठवाडा दादासाहेब काळे ज्येष्ठ मार्गदर्शक तथा विभागीय अध्यक्ष मराठवाडा प्रदीप पाटील जगताप जिल्हाध्यक्ष छत्रपती संभाजीनगर सुधाकर जेठे जिल्हाध्यक्ष ग्रामीण छत्रपती संभाजीनगर सौ. पायल ताई बुलबुले जिल्हाध्यक्ष छत्रपती संभाजीनगर.

## भरती परीक्षा सुधारणांवर चर्चेसाठी उपस्थित राहण्याचे विभागीय आयुक्तांचे आवाहन; 21 सप्टेंबर रोजी उच्चस्तरीय समिती भेट देणार

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :-** राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी गठित उच्चस्तरीय समिती सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात भेटण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या भेटीसाठी विद्यार्थी, परीक्षार्थी व संबंधित घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, अभ्यासिका चालक-मालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच परीक्षा पद्धतीबाबत सूचना मांडू इच्छिणाऱ्या नागरिकांनी भेटसाठी उपस्थित राहून आपले अनुभव व सूचना समितीसमोर मांडाव्यात. यापूर्वी ई-मेलद्वारे सूचना व अभिप्राय सादर केलेल्या विद्यार्थी व संबंधित घटकांनीही बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी आवश्यक सुधारणा, तसेच परीक्षा प्रक्रियेतील अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत याबाबत चर्चा होणार आहे. परीक्षा पद्धतीशी संबंधित विविध घटकांना प्रत्यक्ष चर्चेत सहभागी होऊन आपल्या सूचना मांडण्याची संधी मिळणार आहे.

भरती परीक्षा पद्धती अधिक सक्षम करण्यासाठी विद्यार्थी, परीक्षार्थी, क्लास चालक-मालक व संबंधित संस्थांनी या बैठकीत सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या सूचना मांडाव्यात, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.

## तालुका क्रीडा स्पर्धेत नॅशनल इंग्लिश हायस्कूल अजिंठाचा फुटबॉलमध्ये विजय

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीरोद्दीन

होली फेथ भराडी संघाचा २–० ने पराभव; जिल्हास्तरावर दिमाखात प्रवेश



तालुका क्रीडा स्पर्धेत *नॅशनल इंग्लिश हायस्कूल* अजिंठा या शाळेच्या फुटबॉल संघाने उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम सामन्यात होली फेथ, भराडी संघाचा २–० असा पराभव करून विजेतेपद पटकावले. या शानदार विजयासह *नॅशनल इंग्लिश हायस्कूल अजिंठाच्या* संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत दिमाखात प्रवेश केला आहे.

अंतिम सामन्यात अजिंठाच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळ करत सामन्यावर आपले वर्चस्व कायम ठेवले. उत्कृष्ट सांघिक खेळाच्या जोरावर संघाने दोन गोल नोंदवत २–० असा विजय मिळवला. या वेळी तालुका श्री समन्वयक धन्वत सर, तसेच पंच श्री चौधरी सर आणि श्री तबरेज सर यांची उपस्थिती होती. फुटबॉल संघाचे प्रशिक्षक शेख खुसरो सर, *नॅशनल इंग्लिश हाय स्कूल* चे प्राचार्य श्री शेख तलहा अहेमद सर यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशाबद्दल हमदर्द चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष श्री. शेख इकबाल अहेमद सर, संस्थेचे सचिव श्री. शेख जिया उल हक सर ,डायरेक्टर श्री शम्स उल हक सर ,श्री पठाण सईद खान सर , श्री मोइन उल हक सर ,श्री शेख हमजा सर शाळेचे मुख्याध्यापक, अंसारी जहीर अहेमद,तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विजयी संघाचे कौतुक करून खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

*नॅशनल इंग्लिश हायस्कूल अजिंठाच्या* फुटबॉल संघाच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे...

## जिल्हा मजुर फेडरेशन येथे ध्वजवंदन



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :-**17 सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जिल्हा मजुर फेडरेशन च्या वतीने फेडरेशन चे अध्यक्ष अब्दूल अजिज ऊर्फ सगरू भाई यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आहे

यावेळी ज्येष्ठ माजी अध्यक्ष तथा संचालक सुधाकरराव देशमुख लोकश्रेय मित्र मंडळा चे संस्थापक अध्यक्ष सलीम इनामदार. सहकारी संस्थेचे चेअरमन नामदेव लोखंडे, साहेबराव ताटे. ज्ञानेश्वर जाधव . भगवान मुंगळीकर. शेख माजेद. लक्ष्मीकांत गरुड शेख शाकेर व कर्मचारी मोहसीन सिद्दीकी किशन धस यांची उपस्थिती होती.

## किमान कौशल्य आत्मसात करणे विद्यार्थ्यांसाठी काळाची गरज - डॉ आश्विन रांजणीकर

हिंदू प्रकाशवार्ता)प्रतिनिधी



सोयगाव,दि.१८ ( प्रतिनिधी)

छत्रपती संभाजी नगर येथील येथील अजिंठा शिक्षण संस्था संचलित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अजीवन अध्यापन व विस्तार केंद्राचे संचालक डॉ. आश्विनी रांजणीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पंडित नलावडे तर प्रमुख पाहुणे म्हणून मौलाना आझाद महाविद्यालय चे प्रोफेसर शेख अफरोज व प्रा पिराजी कमले हे उपस्थित होते, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आश्विन रांजणीकर म्हणाले कि आजीवन विस्तार व अध्ययन केंद्राचे विद्यापीठ कार्यक्षेत्रात 62 विस्तार केंद्र व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 21 विस्तार केंद्राच्या माध्यमातून जे नऊ सर्टिफिकेट कोर्सेस या केंद्रात द्वारे विद्यार्थ्यांसाठी चालवली जात असून यामध्ये शिक्षणाचा विस्तार व शिक्षण क्षेत्रातील नकारात्मकाता संपविणे हा केंद्राचा मुख्य उद्देश असून शिकून काय करावे, शिकून काय होणार या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये पडलेल्या प्रश्नाला उत्तर म्हणजे अजीवन विस्तार केंद्र ज्या केंद्रातून विविध नऊ प्रकारचे सर्टिफिकेट कोर्सेस हे चालवले जातात त्यामध्ये सेल्स रिप्रेझीटेड रिप्रेझेंटेटिव्ह अँड मार्केटिंग पोलिसांसाठीचा ड्रेस मॅनेजमेंट बँकिंग चे विविध सर्टिफिकेट कोर्स सहा सहा महिन्याचे ज्याचा कालावधी असल्याचे रांजणीकर म्हणाले तसेच शहरातील विविध मॉल सोबत एम ओ यु व ऑटोमोबाईल क्षेत्रातील विविध वर्कशॉप सी एम ओ यु बँकिंग सोबत एम ओ यु असल्याचे सांगून या प्रकारचे सर्टिफिकेट केल्यानंतर कोर्सेस केल्यानंतर विद्यार्थ्यांना 100% जॉबची संधी असल्याचे रांजणीकर आपल्या भाषणात म्हणाले या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांनी काळाची गरज ओळखून शिक्षण क्षेत्रातील विविध कौशल्य आत्मसात करावे व शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा एक कमी व्यक्तिमत्व विकास घडवावा असे म्हणाले याप्रसंगी हिंदी विभागाच्या वतीने राष्ट्रीय हिंदी दिनाच्या निमित्ताने मोलाना आझाद कॉलेजच्या प्रा डॉ.शेख अफरोज यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रभाषा हिंदी व रोजगारांच्या संधी या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले हिंदी भाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध उपलब्ध संधीचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आव्हान त्यांनी केले प्रारंभी आजीवन विस्तार विभागाचे समन्वयक प्रा.डॉ. भास्कर टेकाळे यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन प्रा डॉ संतोष तांदळे यांनी मानले तर आभार प्रा.डॉ. शिल्पा जीवरग यांनी मानले कार्यक्रमास डॉ दिलीप बिरुटे, डॉ प्रशांत देशमुख, प्रा डॉ लक्षिमी नारायणा कुरपटवार, डॉ राजू वनारसे ,डॉ विक्रम भुतेकर, डॉ ज्योती आधाने,प्रा डॉ पांडुरंग दाबके, प्रा गोविंद फड, राजू तुपे,प्रा रामहरी सोंडगे, किरण इंगळे. प्रा तुषार कांबळे,प्रा डॉ वीरेंद्र सुरासे, डॉ किशोर लोखंडे ,नरोडे मॅडम ,प्रा धनले,मोठ्या संख्येने विद्यार्थी प्राध्यापक उपस्थित होते.

# मागील पाच वर्षांतील कुष्ठरुग्णांच्या सहवासितांचे सर्वेक्षण

## जिल्ह्यात 2,280 कुष्ठरुग्णांची नोंद; 16 सप्टेंबर ते 31 ऑक्टोबरदरम्यान विशेष मोहीम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : कुष्ठरोगाचे लवकर निदान करून वेळेत उपचार सुरू करण्यासाठी जिल्ह्यात 'फोकस्ड लेप्रसी कॅम्पेन' अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत मागील पाच वर्षांत आढळलेल्या कुष्ठरुग्णांच्या सहवासितांचे विशेष सर्वेक्षण करण्यात येणार आहे. १६ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत आशा कार्यकर्त्या, आरोग्य सेवक व आरोग्य सेविका यांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण केले जाणार आहे.

शाश्वत विकास ध्येयांतर्गत (एसडीजी) केंद्र शासनाने २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यासाठी समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून कुष्ठरोगाची लक्षणे असलेल्या व्यक्तींची प्रत्यक्ष तपासणी, नवीन रुग्णांचे लवकर निदान आणि त्यांना बहुविध औषधोपचाराखाली




(एमडीटी) आणण्यावर भर दिला जात आहे.

या मोहिमेत विशेष जोखमीच्या गटातील व्यक्तींचीही तपासणी केली जाणार आहे. त्यामध्ये एमबी (बहुविध जंतूजन्य) प्रकारातील कुष्ठरुग्ण, बालकांमध्ये आढळलेले कुष्ठरुग्ण तसेच ग्रेड-१ व ग्रेड-२ विकृती असलेल्या रुग्णांच्या सहवासितांचा समावेश आहे. सर्वेक्षणादरम्यान संशयित व्यक्ती आढळल्यास त्यांची पुढील तपासणी करून आवश्यक उपचारासाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**पाच वर्षांत २,२८० रुग्णांची नोंद**

मागील पाच वर्षांत जिल्ह्यात एकूण २,२८० कुष्ठरुग्णांची नोंद झाली आहे. यापैकी ९९८ रुग्ण एमबी प्रकारातील आहेत. ७९ बालकांना कुष्ठरोगाचे निदान झाले असून, ग्रेड-१ विकृती असलेले ८७ आणि ग्रेड-२ विकृती असलेले ९ रुग्ण आढळले आहेत.

**ही लक्षणे दिसल्यास तपासणी करा**

फिकट लालसर किंवा तांबूस रंगाचा व संवेदना कमी झालेला अथवा बधीर चट्टा, त्वचेवर तेलकट किंवा चमकदारपणा, कानाच्या पाळ्या जाड होणे, मज्जातंतूंमध्ये दुखणे किंवा जाडी जाणवणे, तसेच हात-पायांना मुंग्या येणे, बधिरपणा किंवा अशक्तपणा जाणवणे ही कुष्ठरोगाची प्रमुख लक्षणे आहेत. यापैकी कोणतेही लक्षण आढळल्यास नागरिकांनी जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत तपासणी करून घ्यावी.

कुष्ठरोगाचे लवकर निदान आणि वेळेत उपचार केल्यास विकृती टाळण्यास मदत होते. त्यामुळे संशयास्पद लक्षणे लपवू नयेत किंवा दुर्लक्षित करू नयेत, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

**आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन**

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनू पी. एम., जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर आणि सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. शिवकुमार हालकुडे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, घरी भेट देणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करून कुटुंबातील सदस्यांची तपासणी करून घ्यावी. कुष्ठरोगाचे लवकर निदान, योग्य उपचार आणि नियमित औषधोपचारामुळे रोगावर नियंत्रण मिळविणे शक्य आहे. कुष्ठरोगाविषयीचे गैरसमज व कलंक दूर करण्यासाठी नागरिकांनी सर्वेक्षणास सक्रिय सहकार्य करावे.

# विश्वकर्मा प्रकट दिन विविध धार्मिक उपक्रमांनी साजरा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : श्री विश्वकर्मा चॅरिटेबल ट्रस्ट, सिडको एन-६ आणि विश्वकर्मा समाज, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान विश्वकर्मा प्रकट दिन गुरुवारी (१७ सप्टेंबर) सिडको एन-६ येथील श्री गणेश विश्वकर्मा मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.



यानिमित्त सकाळी ७ वाजता पंचामृत अभिषेक व विधिवत महापूजा करण्यात आली. त्यानंतर सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत ह.भ.प. महेश निनाळे महाराज यांचे हरिकीर्तन झाले. पुढे संगीतमय भजनाचा कार्यक्रम पार पडला. या धार्मिक सोहळ्यास हास्यसम्राट व अभिनेते योगेश शिरसाठ यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी मार्गदर्शन करताना ससो खंडाळकर यांनी विश्वकर्मा भवनाच्या बांधकामासाठी आर्थिक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच विश्वकर्मा चौकाचे सुशोभीकरण करावे आणि समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विश्वकर्मा कौशल्य विद्यापीठाची स्थापना करावी, अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमात 'चला हवा येऊ द्या'चे कलाकार व अभिनेते योगेश शिरसाठ, संस्थापक अध्यक्ष अशोक पगार, अध्यक्ष ज्योतिषाचार्य पं. प्रकाश जांगिड महाराज, उत्तमराव पांचाळ आदींनी मार्गदर्शन केले.

यावेळी पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले, नगरसेविका माधुरीताई देशमुख, मीनाताई, नितीन खरात, खैरणार, शकुंतलाबाई शिरसाठ, पांडुरंग शिरसाठ, सचिव संजय विश्वकर्मा, राम काळे, उद्धवराव थोरात, बबनराव पवार, जयवंत गाडेकर, राजू सालपे, सिताराम सपकाळ, सीताराम राजगुरू, शंकरलाल जांगिड, करण जांगिड, रामभरोस जांगिड, मनीराम जांगिड, रामप्रसाद जांगिड, कैलाश खंडेलवाल, रामप्रकाश जांगिड, रिछपाल जांगिड, हुकमाराम जांगिड, दयाशंकर विश्वकर्मा, मयाशंकर विश्वकर्मा, शिवप्रसाद पगार, सुभाष पंवार, प्रसिद्धी प्रमुख बाळकृष्ण क्षीरसागर, स्वप्नील शिरसाठ आदी उपस्थित होते.

भगवान विश्वकर्मा यांच्या पूजनानिमित्त आयोजित या सोहळ्याला विश्वकर्मा समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने समाजबांधवांनी उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश दिसागज यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्योतिषाचार्य पं. प्रकाश जांगिड महाराज यांनी केले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त भाजपा कार्यालयात ध्वजारोहण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**जालना** : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त भाजपा जिल्हा कार्यालय येथे भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मराठवाड्याच्या मुक्तीसाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले, "मराठवाड्याच्या मुक्तीसाठी हुतात्म्यांनी दिलेले बलिदान सदैव प्रेरणादायी राहील. त्यांच्या त्यागाचे स्मरण करणे हीच त्यांना



खरी आदरांजली आहे. त्यांच्या शौर्य आणि बलिदानातून प्रेरणा घेऊन राष्ट्राच्या विकासासाठी योगदान देणे ही आपली जबाबदारी आहे."

मराठवाडा मुक्ती संग्राम हा स्वातंत्र्य, लोकशाही आणि स्वाभिमानासाठी झालेल्या संघर्षाचा गौरवशाली इतिहास आहे. या लढ्यात योगदान देणाऱ्या सर्व स्वातंत्र्यसैनिक व हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी माजी आमदार कैलास गोरंट्याल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर जिजा भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, धनराज काबलीये, सरचिटणीस सुनील पवार, अमोल कारंजेकर यांच्यासह भाजपा पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोवंशाची बेकायदा वाहतूक करणारे पोलिसांच्या ताब्यात; सात लाखाचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाश वार्ता

**परभणी:-** गेल्या अनेक दिवसापासून गोवंशाची चोरून तस्करी करण्याच्या अनेक घटना परभणी शहरात व परिसरात घडत असतानाच असाच एक प्रकार आयशर मधून गो वंशाची बेकायदा कत्तल करण्यासाठी वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती या माहितीच्या आधारे कारवाई करत नमुना पोलिसांच्या विशेष पथकाने आयशर टेम्पो व सहा गोवंश जातीचे पशु एकूण सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



करण्यात आला याप्रकरणी दिनांक 17 सप्टेंबर गुरुवार रोजी रात्री नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

अधिक माहिती अशी की नमुना पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पोलीस अंमलदार मोहम्मद मोहसिन लोमटे खूपसे यांच्या विशेष पथकाने गस्तीवर असताना एका आयशर टेम्पोमध्ये दाटीवाटीने गोवंश जनावरे बेकायदा कतली साठी घेऊन जात असल्याची माहिती मिळाली नंतर या पथकाने एमआयडीसी जवळ सापळा असून या रस्त्याने भरधाव वेगाने जाणाऱ्या टेम्पोस थांबवले व विचारपूस करत असताना टेम्पो चालकांनी आपले नाव विशाल केशवराव खरे असे असल्याचे सांगितले व सदरील गोवंशाची वाहतूकशेख साजिद शेख वहाब यांच्या सांगण्यावरून करत असल्याची माहिती दिली सदरील कारवाईत दोन लाख रुपया किमतीचे गोवंश जातीचे आयशर टेम्पो जप्त करण्यात आला असून याप्रकरणी विशाल केशवराव खरे व शेख साजिद शेख वहाब नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# कर्करोगाचे लवकर निदान व योग्य उपचारासाठी जनजागृती आवश्यक : डॉ. अरविंद गायकवाड

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगरच्या वतीने शासकीय कर्करोग रुग्णालयातील गरजू रुग्णांच्या उपचारासाठी सुमारे तीन लाख रुपये किमतीची शस्त्रक्रियेसाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे व साहित्य देण्यात आले. मंगळवारी (दि. १६) हॉटेल ऑरिस येथे आयोजित कार्यक्रमात हे साहित्य रुग्णालयासाठी सुपूर्द करण्यात आले. यावेळी कर्करोग जनजागृतीवर विशेष व्याख्यानही झाले.

शासकीय कर्करोग



रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) डॉ. अरविंद गायकवाड यांनी कर्करोगाविषयी मार्गदर्शन केले. समाजात कर्करोगाबाबत जागरूकता वाढविणे गरजेचे असून, आजाराचे वेळीच निदान आणि योग्य उपचार झाल्यास अनेक प्रकारच्या कर्करोगांवर प्रभावी उपचार शक्य आहेत, असे त्यांनी सांगितले. कर्करोगाची संभाव्य लक्षणे, नियमित तपासणी, लवकर निदानाचे महत्त्व तसेच उपचारांबाबत असलेले गैरसमज याविषयी त्यांनी माहिती दिली.

रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटे. सीए मुकुंद पागे यांनी सांगितले की, समाजातील गरजू रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने क्लबच्या वतीने विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविले जात आहेत. शासकीय कर्करोग रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गरजू रुग्णांना या उपकरणांचा लाभ व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कर्करोगासारख्या गंभीर आजाराबाबत जनजागृती करण्यासोबतच गरजू घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमास रोटरी क्लबचे पदाधिकारी, सदस्य, रोटरी परिवारातील सदस्य तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अध्यक्ष रोटे. सीए मुकुंद पागे, मानद सचिव रोटे. पंकज लोया, कोषाध्यक्ष रोटे. दीपाली सेवळीकर यांच्यासह क्लबच्या पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# घाटीत प्रबोधनकार ठाकरे यांना जयंतीनिमित्त अभिवादन




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. गुरुवारी (दि. १७) प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपअधिष्ठाता डॉ. के. डी. गर्कल, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. विनोद मुंदडा, डॉ. भारत सोनवणे, डॉ. सिराज बेग, डॉ. अंजली दहिफळे, डॉ. सुचिता जोशी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, विभागप्रमुख डॉ. सरोजिनी जाधव, डॉ. एम. बी. लिंगायत, डॉ. प्रसाद देशपांडे, डॉ. शैलजा राव, डॉ. राधेय खेत्रे, सहयोगी प्राध्यापक डॉ. अनिल गायकवाड, डॉ. राजेश ओहळ, अधिष्ठाता कार्यालयाचे नोडल अधिकारी डॉ. सलमान शेख, प्रशासकीय अधिकारी महेश गावडे, चंद्रकांत कुमावत, अनिल गाडे, अधिसेविका अलका वळवी, ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, शारीरिक शिक्षण निर्देशक अशिका बरालिया यांच्यासह सर्व विभागप्रमुख, कार्यालय अधीक्षक, अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर व विद्यार्थी उपस्थित होते.

## कुंभेफळ ग्रामपंचायतीत ग्रामविकास सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची आढावा बैठक

# ग्रामविकास योजनांना गती देण्याच्या सूचना; जिल्ह्याच्या विविध उपक्रमांचे सचिवांकडून कौतुक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील कुंभेफळ ग्रामपंचायतीला भेट देऊन ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची पाहणी केली. त्यानंतर ग्रामपंचायत सभागृहात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. योजनांची कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

डॉ. पुलकुंडवार यांचे सकाळी जिल्हा परिषदेत आगमन झाले. जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, बांधकाम सभापती सचिन गरड, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार यांनी जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीची पाहणी केली. त्यानंतर वेरूळ सभागृहात त्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला. यावेळी वासुदेव सोळंके यांनी जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामकाजाची माहिती व विश्लेषण सादर केले. जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने एका अधिकाऱ्याकडे एकापेक्षा अधिक पदभार असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी रिक्त पदांवर तातडीने राज्यस्तरावरून अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली.



अधिकाऱ्यांवरील अतिरिक्त पदभारामुळे कामांचे नियोजन आणि विहित कालावधीत पूर्तता करण्यात अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांची कमतरता असून पावसाळ्यात ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे जोडरस्त्यांची संख्या वाढविण्यासह बीओटी तत्त्वावरील कामांना मंजुरी देण्याची मागणी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी केली.

**कुंभेफळमधील उपक्रमांची पाहणी**

कुंभेफळ ग्रामपंचायतीत डॉ. पुलकुंडवार यांनी ग्राम कृषी संजीवनी व प्रयोगशाळा, विद्यार्थी अभ्यासिका केंद्र, शाळा, अंगणवाडी, व्यायामशाळा, महिलांची व्यायामशाळा, घरकुल, मशरूम उत्पादन केंद्र आदी उपक्रमांची पाहणी केली. ग्रामपंचायतीने राबविलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. ग्रामपंचायत कार्यालयासमोर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

यावेळी स्वयंसहायता समूहातील महिलांना वैयक्तिक लाभाच्या योजनांअंतर्गत कर्जाचे वाटप करण्यात आले. नव्याने स्थापन झालेल्या एकल महिला बचत गटांना पासबुक, घरकुल पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना घराच्या चाव्या देऊन ताबा, तसेच आयुष्मान भारत कार्ड, समृद्धी योजना, लेक लाडकी योजनेशी संबंधित लाभांचे वितरण करण्यात आले. स्थापत्य अभियंत्यांना प्रमाणपत्रेही देण्यात आली. पंचायत समितीचे सभापती कल्याण गायकवाड यांनी प्रास्ताविक करून मान्यवरांचे स्वागत केले.

**घरकुल, बचत गटाच्या कामाचे कौतुक**

ग्रामपातळीवर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेताना डॉ. पुलकुंडवार यांनी सर्व योजना विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. प्रधानमंत्री आवास योजनेत राज्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या १५ लाख घरकुलांच्या उद्दिष्टात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने राज्यात दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. आवास प्लस सर्वेक्षणातही जिल्ह्याने प्रथम क्रमांक मिळविल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

'उमेद' अभियानांतर्गत स्वयंसहायता समूहांच्या बांधणीत जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असून समूह स्थापनेच्या संख्येच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर असल्याची माहिती देण्यात आली. 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत एकल महिलांचे स्वयंसहायता समूह स्थापन करून त्यांची बँक खाती उघडण्यात आली. महिलांना पासबुकचे वितरण करण्यात आले. तसेच 'लखपती दीदी' संकल्पना पुढे नेण्यासाठी स्वयंसहायता समूहांचे बँक कर्ज प्रस्ताव तातडीने मंजूर करून धनादेशांचे वितरण डॉ. पुलकुंडवार यांच्या हस्ते करण्यात आले.

कुंभेफळ येथील उपजीविकेच्या उपक्रमांचे, विशेषतः

मशरूम उत्पादक समूहाच्या कामाचेही सचिवांनी कौतुक केले. 'उमेद' अभियानातील विविध घटकांमध्ये जिल्ह्याचे काम उत्कृष्ट असल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके तसेच जिल्हा व तालुका कक्षाच्या कामाचे त्यांनी कौतुक केले.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेली पोस्टर्स व विविध उपक्रमांची माहितीही सचिवांना देण्यात आली.

बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रसाद जटाळे, जिल्हा कृषी अधिकारी प्रकाश पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक साहेबराव चव्हाण, कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेळके, कार्यकारी अभियंता किरण धनके, पशुसंवर्धन उपआयुक्त नानासाहेब कदम, शिक्षण अधिकारी नियोजन राकेश साळुंके, उपअभियंता दत्तात्रय श्रीखंडे, उपशिक्षण अधिकारी गीता तांदळे, नीता श्रीश्रीमाळ, सहायक प्रशासनाधिकारी दिलीप निकम, गटविकास अधिकारी शिवाजी साळुंके, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर बिडाईत, 'उमेद'चे व्यवस्थापक विक्रम सरगर, आयटी सेलचे पराग बिडकर यांच्यासह सर्व तालुक्यांचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, उपअभियंता, शाखा अभियंता व आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे यांनी आभार मानले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911